RNI NO-MAHMAR/2022/90217

Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

वर्ष ३ रे अंक : २४९ वा सोमवार दि ०१ डिसेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये



# सौ अर्पिता विजयराज शिंदे या निवडून आल्यास बुलढाण्यात होणार नवीन विकासाचा राजमार्ग तयार




**राज्यभरात नगर पालिका निवडणुकीचे पडघम वाजत आहे. बुलढाणा नगर पालिका नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी घुमशान सुरू आहे.विद्यमान आमदार संजय गायकवाड आणि माजी आमदार विजयराज शिंदे यांच्यात विस्तव ही जात नाही.दोघेही महायुतीचे शिलेदार असले तरी नगरपालिकेत युती नसल्याने दोघांच्या सुविद्य पत्नी एकमेकांच्या विरोधात दंड थोपटून उभ्या आहेत.आमदार संजय गायकवाड यांच्या पत्नी सौ पूजाताई गायकवाड या शिवसेनेच्या धनुष्यबाण या निशाणीवर तर माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या पत्नी सौ अर्पिताताई शिंदे या भाजपाच्या कमळ या निशाणीवर उभ्या आहेत. माजी आमदारांना असल्याने विकासासाठी कुठून निधी आणता येईल याचे सर्व रस्ते त्यांना तोंडपाठ आहे.आ.संजय गायकवाड यांना बुलढाणा शहरात मताधिक्य नाही.विद्यमान आमदार संजय गायकवाड यांना जनतेने काठावर का होईना दुसऱ्यांदा संधी दिली आहे.परंतु आ.संजय गायकवाड यांना बुलढाण्यात ते दोन वेळा नगराध्यक्ष पदाची तसेच दोन वेळा विधानसभेची निवडणूक लढवूनही त्यांना बुलडाणा शहरात मताधिक्य मिळालेले नाही.**

जनसंचलन/बुलढाणा

माजी आमदार विजयराज शिंदे यांनी सुद्धा त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील इतर आमदारांच्या तुलनेत बुलडाणा शहरात फार मोठी विकासाची कामे केलेली आहे. त्या विकास कामांच्या जोरावरच त्यांना येथील जनतेने तीन वेळेस आमदार केले होते. १९९९ चा अपवाद वगळता त्यांना बुलढाणा शहरातील जनतेने भरभरून मते दिलेली आहे. २००४ च्या विधानसभेत त्यांना शहराने मताधिक्य दिलेले आहे. २००९ मध्ये तर बुलढाणा शहरातील ५७ मतदार बूथ पैकी तब्बल ५५ मतदार बूथवर विजयराज शिंदे यांना मताधिक्य होते. केवळ दोन बुथवर एकावर २ मतांनी आणि एका बुथवर ६ मतांनी त्यांना कमी मते मिळाली होती.या दोन्ही वेळा त्यांच्या विरोधात काँग्रेसचा उमेदवार उभा होता. एव्हढेच नव्हे तर २०१९ विधान सभा वंचितच्या तिकिटावर लढूनही बुलढाणा करांनी त्यांना बुलढाणा शहरात प्रचंड मताधिक्य दिलेले आहे.काँग्रेसला मते देऊन शहराचा कोणता फायदा होईल? विद्यमान आमदार आणि माजी आमदार तसे पहाता या दोघांच्या मधात काँग्रेस ही पाय रोवून उभी आहे.काँग्रेसच्या वतीने काँग्रेसचे शहराध्यक्ष दत्ता काकस यांच्या पत्नी सौ लक्ष्मीताई काकस या उभ्या आहेत. आमदार आणि माजी आमदार यांच्या टक्करीत दादागिरीवर प्रभावी लस दत्ता काकस असे म्हणत काँग्रेसचा उमेदवार तग धरून उभा आहे.परंतु काँग्रेसला मते देऊन शहराचा कोणता फायदा होईल ? अशी चर्चा नागरिकांत होत आहे. आमदार आणि माजी आमदार यांच्या भांडणात काँग्रेसच्या उमेदवाराचे पारडे जड दिसत असले तरी काँग्रेस सत्तेत नसल्याने काँग्रेसचा उमेदवार निवडून देवून शहराचा काय फायदा होईल? याचा विचार मतदार करतांना दिसत आहे.गल्ली पासून दिल्ली पर्यंत सत्तेत असणारी काँग्रेस शेवटच्या घटका मोजत आहे. कोणत्याही सत्तेची भागीदार काँग्रेस राहिलेली नाही.तसेच काँग्रेसचे नगरसेवक सुद्धा बुलढाण्यात निवडून येतील अशी शक्यता नाही. आमदार आणि माजी आमदार यांच्या भांडणात सौ काकस यांना मते द्यावी या निर्णयावर येऊन इथे काँग्रेसचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडून दिला तरी येणारी पाच वर्षे काँग्रेसच्या उमेदवाराना निधी साठी झगडावे लागेल.राज्यात आणि देशात सुद्धा भाजपाचे सरकार असल्याने काँग्रेसच्या नगरध्यक्षाला विकास कामांसाठी निधी मिळेल याची शक्यता नाही. त्यामुळे काँग्रेसला दिलेले मत हे वायाच जाण्याची शक्यता असल्याने ञ्द्ध म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो असे म्हणण्याची वेळ बुलडाणा करांवर येईल अशी भीती व्यक्त होत आहे.

## गल्लीपासून दिल्ली पर्यंत भाजपची सत्ता....

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुशल नेतृत्वामध्ये भारत हा विश्वगुरू होत आहे.गृहमंत्री अमित शहा यांच्या कुशल मार्गदर्शनामध्ये भाजपाची वाटचाल गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत भाजपचा भगवा फडकत आहे होत आहे.येणारी चार वर्षे केंद्रात आणि राज्यात भाजपचीच सत्ता राहणार आहेच. परंतु येणारी अनेक वर्षे केंद्रात आणि राज्यातून भाजपच निवडून येईल असे बोलल्या जात आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता राज्यातील महायुतीचे काय होईल ते सांगता येत नाही. वृत्तपत्रांमध्ये आणि विविध चॅनेल वरून येणाऱ्या बातम्या ऐकल्या तर असे वाटते की राज्यातील युतीतील शिवसेना कधी बाहेर फेकल्या जाईल हे सांगता येत नाही. मुंबईमध्ये गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्टपणे सांगितले की भाजपाला कोणत्याही कुबड्यांची गरज नाही. असे झाल्यास एकनाथ शिंदे यांची शिवसेना कधी सत्ते बाहेर जाईल हे सांगता येत नाही.चित्रही तसेच दिसत आहे.त्यामुळेच कदाचीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपा शिवसेना किंवा अन्य कोणत्याही पक्षाची युती झालेली नाही. बुलढाणा मध्ये शिवसेनेचा उमेदवार निवडून दिल्यास आणि शिवसेनाच जर सत्तेच्या बाहेर गेली तर मग काय ? असा भविष्यात प्रश्न निर्माण होऊ शकतो.

## आमदार आणि नगराध्यक्ष एकाच घरातील असल्यास सत्तेचे विकेंद्रीकरण नाही


विद्यमान आमदार आणि माजी आमदार यांच्यात राजकीय स्पर्धा आहे हे सर्वांना माहिती आहे. विद्यमान आमदार सर्व सत्ता घरातच ठेवू पाहतात.पक्षातील पदे घरात, निवडणुकीत तिकिटे घरात. ज्या कार्यकर्त्यांनी हाडाची काडे करून शिवसेना टिकवली त्याच कार्यकर्त्यांना शिवसेनेत तिकिट मिळाली नाही. सुरुवातीला शिवसेना वाढवण्यासाठी दोघांचा ही सिंहाचा वाटा होता.संजय गायकवाड यांनी मध्यंतरी छावा, राष्ट्रवादी काँग्रेस या प्रवासा दरम्यान त्यांनी शिवसेना संपविण्याचेच काम केले.त्यावेळी शिवसेना टिकून ठेवण्याचे नव्हे तर वाढविण्याचे काम विजयराज शिंदे यांनी केले होते.आता नगरपालिका निवडणुकीत दोघांच्या पत्नी उभ्या आहेत. विद्यमान आमदार हे आमदार असल्याने त्यांच्याच पत्नीस निवडून देण्यात शहरवासीयांचा कोणताही फायदा होणार नाही. कारण आमदार संजय गायकवाड हे आणतील तोच निधी,तीच कामे मिळेल.त्यामुळे निधी आणण्यासाठी स्पर्धा होणार नाही.तसेच सत्तेचे शहरात एकच केंद्र राहणार असल्याने नागरिकांना दुसरा कोणताही पर्याय सुद्धा राहणार नाही.आणि ही मोनोपल्ली लोकशाहीत घातक आहे असे वाटते. त्यामुळे आमदार आणि नगराध्यक्ष आणि नगरसेवक एकाच घरातील असल्यास सत्तेचे विकेंद्रीकरण होणार नाही.सौ अर्पिताताई शिंदे यांना निवडून दिल्यास शहरात सत्तेचे दुसरे केंद्र स्थापन होईल. परंतु यावेळेस माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या पत्नीस निवडून दिल्यास त्यांचे राजकीय वजन वापरून बुलढाणा शहराच्या विकासासाठी निधी खेचून आणतील.माजी आमदार हे सध्या भाजपाचे जिल्हाध्यक्ष आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कामगार मंत्री आकाश भाऊ फुंडकर, माजी मंत्री संजय कुटे, आमदार श्वेताताई महाले यांच्या मर्जीतील आहे. सरकार आणि प्रशासन दरबारी त्यांच्या शब्दाला मान आहे. माजी झाले तरी ते इतर कोणत्याही लोकप्रतिनिधी पेक्षा जास्त संपर्कात आहे.मंत्रालय स्तरावर सर्व मंत्र्यांसोबत त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत.

त्यामुळे माजी आमदार यांच्या पत्नीस बुलडाणा शहरवासीयांनी निवडून दिल्यास बुलडाणा शहराचा मोठा फायदा होणार आहे.विद्यमान आणि माजी आमदार दोघेही विकास कामे करण्यासाठी चढाओढ करतील.भलेही ती लढाई श्रेयवादाची झाली तरी दोघेही निधी आणण्यासाठी प्रयत्न करतील आणि यात बुलडाणा शहरात मोठ्या प्रमाणात विकास कामे होतील. विद्यमान आणि माजी आमदारांच्या विकास कामांच्या चकमकीत बुलढाणा शहराचा फायदा होऊन शहर उजळून निघेल.दोघांची स्पर्धा कशी आहे हे शहराला सांगण्याची आवश्यकता नाही.

# घाऊक घसरणीचा गुणाकार

## संपादकीय लेख

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दरम्यान महाराष्ट्रातील अव्वल दर्जाच्या काही नेत्यांच्या भोवती वादाची वादळे घोंगावली. त्यामुळे राजकारणाचा स्तर घसरल्याची चर्चा समाजातील उदारमतवादी बुद्धिवंतात नेहमीप्रमाणे होऊ लागली. मात्र अशी राजकारणाच्या स्तराबाबत वरवर चर्चा केल्याने त्याचे मूळ कारण समजणे शक्य नाही. संजय गायकवाड, संजय शिरसाट, योगेश कदम, माणिकराव कोकाटे, जितेंद्र आव्हाड-गोपीचंद पडळकर या काही प्रमुख राजकीय नेत्यांच्या भोवती अधिवेशनात वा त्यानंतर लगेचच तयार झालेली वादळे ही राजकारणाचे ङ्गमवालीकरणफ (लुम्पनायझेशन) अधोरेखित करणारी आहेत यात वाद नाही. कारण ही एक सार्वत्रिक प्रक्रिया असल्यासारखे घाऊक मात्रेत राजकारणी सामान्य नितीमूल्ये देखील बिनधास्त पायदळी तुडवताना या निमित्ताने दिसली. मात्र हे ङ्गमवालीकरणफ नेमके कशामुळे झाले व त्याची सुरुवात कशी झाली हे समजून घेतल्याशिवाय त्यावर केलेली टीका ही निरर्थकच ठरेल. राजकारणात जनतेच्या राजकीय नेत्यांप्रति असलेल्या धारणांना सर्वाधिक महत्त्व असते. जनतेच्या धारणा या विशिष्ट विचारधारेला अनुसरून बनवण्याकरिताच संघटित स्वरूपात राजकीय पक्ष विविध कार्यक्रमांद्वारे सातत्याने काम करत असतात. मात्र जनतेच्या धारणा तयार होण्यावर समाजातील इतर असंख्य शक्तींचाही मोठा प्रभाव असतो. यात सांस्कृतिक घटनांबरोबरच अर्थकारणाचा सगळ्यांत मोठा वाटा असतो. राजकारणासाठी लागणारा पैसा ही आजच नव्हे, तर स्वातंत्र्यापूर्वीपासूनच अपरिहार्य गरज राहिलेली आहे. अगदी स्वातंत्र्यापूर्वीदेखील काँग्रेसपासून ते प्रमुख उजव्या विचारधारेच्या शक्तींना देशातील प्रमुख उद्योजक घराणी निधीचा कसा अव्याहत पुरवठा करत असत, याचे दाखले अक्षय मुकूल यांच्या ङ्गगीता प्रेस अँड मेकिंग ऑफ हिंदू इंडियाफ या पुस्तकात दिलेले आहेत. मात्र संघटना चालवण्यासाठी लागणाऱ्या अपरिहार्य निधीची पूर्तता भांडवली वा अर्ध भांडवली समाजात करण्याचा तो सर्वमान्य नितीमत्तेत बसणारा मार्ग त्याकाळी होता. नव्वदच्या दशकात विकसित देशांनी अविकसित देशांवर कर्जे घेण्यासाठी ङ्गस्ट्रक्चरल ॲडजस्टमेंटफच्या माध्यमातून अर्थव्यवस्था खुली करण्याचा जो कार्यक्रम लादला, त्याचे आर्थिक परिणाम तर झालेच; मात्र त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय परिणामांचा फारसा अंदाज तात्काळ अनेकांना आला नाही. आता कालांतराने ते स्पष्ट दिसू लागले आहेत. खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर सांस्कृतिक क्षेत्रात तर खूपच मोठे बदल झाले. मनोरंजन वाहिन्यांवरून सुरू झालेल्या मालिकांनी सर्वसामान्यांच्या नेणिवा या, कोणत्याही मार्गाने आलेला पैसा हीच प्रगती या पातळीवर घडवल्या. त्या मालिकांमध्ये सदासर्वकाळ महालवजा घरात सतत मेकअप करून, चांगले कपडे घालून वावरणारी पात्रे अगदी गरिबी रेषेखालील लोकांच्याही मानसिकतेवर परिणाम करू लागली. गोदीतील हमाल ङ्गहिरोफ होऊ शकतो म्हणून थेटरचे स्टॉल फूल करणाऱ्यांना मल्टिप्लेक्सेसची तिकीटे परवडेनाशी झाली. त्यात दाखवल्या जाणाऱ्या करण जोहरच्या सिनेमांची कथानके त्यांना जादुई वाटावीत, इतकी त्यांच्या जीवनाच्या विपरीत होती. ङ्गधूममसारख्या सिनेमांतून चोरालाच हिरो दाखवूनही लोकांना ते आवडले होते. दुसरीकडे नव्या आर्थिक धोरणामुळे राजकीय क्षेत्रात स्वातंत्र्यापश्चात निवडणुकीत सुरू झालेले पैशाच्या वापराचे प्रमाण प्रचंड वाढले. तसेच या वापराचे व्यावसायीकरण अशा पातळीवर गेले की एखाद्या कॉर्पोरेट कंपनीत हार्वर्डवरून बिझनेस मॅनेजमेंट करून आलेल्या सीईओने देखील तोंडात बोटे घालावीत. या धोरणामुळे देशातील विषमतेत जी प्रचंड वाढ झाली ती आता टोकाला गेली आहे. देशातील १० टक्के लोकांकडे देशातील ७७ टक्के संपत्ती एकवटली आहे. सन २०१७मध्ये देशात तयार झालेल्या संपत्तीतील ७३ टक्के वाटा हा केवळ एक टक्के लोकांकडे गेला. दुसरीकडे सर्वांत गरीब असलेल्या ६७ कोटी लोकांच्या संपत्तीत या काळात केवळ एक टक्काच वाढ



झाली. या आकड्यांच्या खेळाचे अनेकांना वावडे असते, त्यामुळे यात फारसे जायला नको. आरोग्य आणि शिक्षण या जनतेच्या मूलभूत गरजा. त्या तशा मानून त्याची जबाबदारी कल्याणकारी राज्यात घेतली जाते. स्वातंत्र्यापश्चात ती किमान पातळीवर का होईना, घेतली जात होती. ते कल्याणकारी राज्य संपण्याची सुरुवात होणे हा ङ्गमनमोहनॉमिक्सफच्या नावाने सुरू केल्या गेलेल्या नवउदारवादी धोरणाचाच परिपाक आहे. हल्लीच्या राजकारणात पं. नेहरूंच्या राजकीय धोरणांवर सातत्याने टीका करणे हा प्रघात झाला आहे. मात्र नव्वदच्या दशकात आलेल्या आर्थिक उदारीकरणानंतर ङ्गनेहरुव्हियन इकॉनॉमिक्सफच्या नावाने नेहरूंच्या कल्याणकारी अर्थनितीवर काँग्रेसच्याच धुरिणांकडून टीका करणे सुरू झाले होते. आज सर्वसामान्यांना साध्या साध्या आजारांचे उपचार करणेही दुरापस्त झालेले आहेत. बीए, एमएसाठी लाखोंचे शुल्क घेतले जात आहे. आयआयटीत पन्नास-शंभर रुपयात शिकलेली स्वातंत्र्यानंतरची पिढी या वाढलेल्या शुल्काची तुलना दर्जाशी करती झाली आहे. यातून समाजातील बहुसंख्य वर्ग त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावण्यापासून दररोज दूर फेकला जात आहे.







The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बिहारच्या नव्या गृहमंत्र्यांसह भाजपचे तब्बल १४ मंत्री दिल्लीत, वरिष्ठांसोबत मंथन, पडद्यामागे काय घडतंय?


**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाने बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या चेहऱ्यावर लढविलेली निवडणूक प्रचंड बहुमताने जिंकल्यावर उपमुख्यमंत्री आणि नवीन गृहमंत्री सम्राट चौधरी यांच्यासह पक्षाचे सर्व, १४ मंत्री आणि वरिष्ठ नेत्यांचा मोठा लवाजमा दिल्लीत आला आहे. भाजपाध्यक्ष जे पी नड्डा यांनी बुधवारी रात्री आयोजिलेल्या मेजवानीनंतर चौधरी यांनी गुरुवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आणि नवीन मंत्रिमंडळ, राज्य सरकारशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा केली.जदयू आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याबरोबर आता 'मोठा भाऊ-धाकटा भाऊ' हा फॉर्म्युला बिहारमध्ये अस्तित्वात नाही, असे भाजपने गेल्या काही दिवसांत स्पष्ट केले आहे. बिहार ध्ये सर्वेसर्वा भाजप नेतृत्वाची मायक्रो मॅनेजमेंट, बूथवरील कार्यकर्त्यांचे परिश्रम, सोशल मीडियाचा प्रचंड वापर, महिलांना १०-१० हजार रुपये थेट देण्याची आणि जीवीका दिदींना ११०० रुपये देण्याची योजना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींचा झंझावाती प्रचार याबरोबरच विरोधी



महाआघाडीतील, त्यातही राहुल गांधी-तेजस्वी यादव यांच्यातील विसंवाद आणि विस्कळीतपणाचा मोठा फायदा एनडीएला मिळाला, असे निरीक्षण एका वरिष्ठ भाजप नेत्याने मांडलेया नेत्याच्या म्हणण्यानुसार, भाजपने बिहारसाठी ३ वर्षांपासून प्रचंड परिश्रम घेतले. गावागावात पक्षनेते थेट पोहोचत होते. गावागावातील मुख्य कार्यकर्त्यांसाठी एक मोबाईल ॲप्लीकेशन सुरू करून त्यावर त्यांनी रोज किती घरांना भेट दिल्या याचा आढावा पाटण्यातील भाजपच्या वॉर रूममध्ये सतत घेतला जात होता. त्याच्या जोडीला महिलांचे आणि युवकांचे मतदान जास्तीत जास्त होण्यासाठीही मोठे परिश्रम घेण्यात आले. एनडीए एकसंध ठेवण्यासाठी कुशवाह यांच्या मुलाला मंत्री बनविण्याचे आणि राजद नेते तेजस्वी यादव यांच्या संपर्कात गेलेल्या अन्य एका नेत्याला केंद्रात आणखी शक्तिशाली मंत्रालय देण्याचे आश्वासन देऊन भाजपसोबर थांबवून ठेवले गेले. जातीपातीच्या गणितांतही यादव मते पूर्णपणे राजदच्या बाजूने जाणार नाहीत याची काळजी घेतली गेली, असे या नेत्याने सांगितले.एनडीएने बिहारमध्ये पूर्ण एकतर्फी विजय मिळवताना २४३ पैकी २०२ जागा जिंकल्या. एकट्या भाजपने सर्वांत जास्त ८९ जागा जिंकल्या. पण केंद्र सरकारला अत्यंत मोलाचा पाठिंबा देणारे नितीश कुमार यांना मुख्यमंत्रीपदी कायम ठेवताना भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने शक्तिशाली गृहमंत्रालय त्यांच्याकडून ताब्यात घेण्यासाठी त्यांची समजूत काढली. तब्बल ४८ तासांच्या चर्चेनंतर सुमारे दोन दशकांनी हे पद सोडण्यास नितीशकुमार तयार झाल्याचे समजते.जाणकारांच्या मते यंदा भाजप आणि जेडयू यांनी प्रत्येकी १०१ जागा लढवल्या तेव्हाच याचे संकेत मिळाले होते की भाजप यंदा गृहमंत्रालयासारखे मोठे खाते आपल्याकडे घेऊ शकतो. गृहमंत्रालय म्हणजे पोलिसांवर नियंत्रण आणि कायदा आणि सुव्यवस्थेची थेट जबाबदारी. छत्तीसगडमध्ये दिवसेंदिवस क्षीण होत जाणारे नक्षलवादी बिहारमध्ये घुसू शकतात हे पाहून भाजपने गृहमंत्रालय आपल्याकडे ठेवले आहे.

## शिवसेना विरुद्ध भाजप, धुळे जिल्ह्यात महायुतीतच कुस्ती





**धुळे :** राज्यभरात नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. धुळे जिल्ह्यातही तीन नगर परिषद आणि एक नगर पंचायतीची निवडणूक पार पडत आहे. यापैकी तीन ठिकाणी महायुतीत बिघाडी झालेली बघायला मिळत आहे. या तीनही ठिकाणी भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना स्वतंत्र निवडणूक लढताना दिसत आहे. तर दोंडाईचा वरवाडे नगर परिषद निवडणूक ही बिनविरोध ठरली आहे. इथे भाजपचे सर्व नगरसेवक आणि नगराध्यक्षांचीदेखील बिनविरोध निवड झाली आहे.

धुळ्यातील प्रत्येक नगर परिषद आणि नगर पंचायतमधील सविस्तर माहिती जाणून घेऊया.शिरपूर तालुक्यात वरवाडे नगर परिषदेत माजी मंत्री अमरीश पटेल यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. या निवडणुकीत त्यांचे पुतणे चिंतन भाई पटेल हे भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून हेमंत पाटील यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी मिळालेली आहे. विशेष म्हणजे हेमंत पाटील हे काही दिवसांपूर्वीच शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाले आहेत. ते अनेक वर्षांपासून भाजपम ध्ये सक्रिय होते. शिरपूरच्या निवडणुकीत भाजप विरुद्ध शिंदे गट अशी थेट लढत बघायला मिळत आहे.शिंदे गटाचे हेमंत पाटील हे पूर्वी भाजपमध्ये होते. गेल्या निवडणुकीच्या वेळी भाजपने त्यांना एबी फॉर्म दिला नव्हता. त्यामुळे ते नाराज होते. त्याबाबत त्यांनी नाराजी देखील व्यक्त केली होती. दरम्यान, त्यांनी काही दिवसांपूर्वी शिंदे गटात प्रवेश केला. त्यांनी ठाण्यात एकनाथ शिंदेंच्या निवासस्थानी शिवसेनेचे धुळे जिल्हाप्रमुख सतीश तात्या महाले यांच्या उपस्थित शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यांच्या विजयासाठी शिरपूरम ध्ये बुधवारी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वात प्रचारसभा पार पडली होती. या प्रचारसभेत मंत्री दादा भुसे, साक्री विधानसभेच्या आमदार मंजुळा गावित सहभागी होत्या. दरम्यान, भाजपकडून या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची या भागात सभा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा वरवाडे नगरपरिषद निवडणूक ही बिनविरोध ठरली आहे.

## काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात भाजपचं 'ऑपरेशन लोटस'


**लातूर :** दोन दिवसांपूर्वी लातूरचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांनी राष्ट्रवादीत पक्षप्रवेश केला. यानंतर आज लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार त्र्यंबक भिसे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रवेश केला. लातूर ग्रामीणचे माजी आमदार त्र्यंबक भिसे यांनी आज औपचारिकरित्या भाजपात प्रवेश केला. उदगीर नगरपालिकेच्या प्रचारसभेला आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपची सदस्यता स्वीकारली.त्र्यंबक भिसे हे २०१४-२०१९ या काळात लातूर ग्रामीणचे आमदार होते. त्याआधी २००९ ते २०१४ दरम्यान ते जिल्हा परिषद सदस्य होते. काँग्रेस नेते दिलीपराव देशमुख यांचे ते कट्टर समर्थक मानले जात. मात्र अमित देशमुख आणि धीरज देशमुख यांच्याशी त्यांचे समीकरण कधीच जुळले नाही. २०१९ नंतर काँग्रेसम ध्ये त्यांची भूमिका कमी होत गेली, बदललेली राजकीय सम ीकरणे, लातूर ग्रामीणमधील धीरज देशमुख यांचा पराभव आणि दिलीपराव देशमुख यांचा घटता प्रभाव या कारणांमुळे त्यांनी अखेर काँग्रेसला रामराम केला आहे.गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसला लातूर जिल्ह्यात गळती लागलेली पाहायला मिळत आहे. एकेकाळी लातूर हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. मात्र आता याच काँग्रेसला गळती लागली आहे. काही दिवसांपूर्वी लातूरचे महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी राष्ट्रवादी




अजित पवार गटामध्ये प्रवेश केला. त्यानंतर आज माजी आमदार त्र्यंबक भिसे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यामुळे लातूरच्या राजकारणामध्ये अनेक गणितांमध्ये बदल होणार आहेत. भिसे यांचे काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांच्याशी जुळत नसल्याच्या चर्चा काही काळापासून सुरू होत्या. त्याला आज पूर्णविराम मिळाला आहे.लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून त्र्यंबक भिसे यांनी काँग्रेसकडे उमेदवारीचे मागणी केली होती. मात्र पक्षाने धीरज देशमुख यांना उमेदवारी दिल्यामुळे ते नाराज होते. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये याचा परिणाम लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात पाहायला मिळणार आहे. काही दिवसांपूर्वी भिसे यांनी लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांची भेट घेतलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर आज त्यांनी अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला.

## हे फडणवीसांचं सरकार आहे, जास्त कराल तर कापून काढू..

**नागपूर :** रेती माफियांना पक्षात घेतल्याबद्दल पक्षश्रेष्ठींबद्दल उघड नाराजी व्यक्त करीत खळबळ उडवून देणारे सावनेरचे भाजपचे आमदार डॉ. आशिष देशमुख हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. यावेळी निवडणूक प्रचारसभेत बोलताना आशिष देशमुख यांनी विरोधकांना थेट कापून काढण्याची धमकी दिली आहे. देशमुख यांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली असून याचे तीव्र पडसाद आगामी काळात उमटण्याची शक्यता आहे.नगर परिषद, नगर पंचायतच्या निवडणुकीत म तदानाचा दिवस जसजसा जवळ येत आहे, तसे राजकीय वातावरण तापत आहे.



राजकीय नेते मंडळींकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात येत आहेत. आरोप- प्रत्यारोप करताना वादग्रस्त वक्तव्य 'ही राजकीय मंडळींकडून होत आहेत. भाजप आमदार आशिष देशमुख यांनी देखील वादग्रस्त वक्तव्य केले आहे.या धमकीचा व्हिडीओ व्हायरल झाला असून यात आमदार देशमुख हे, "हे देवेंद्र फडणवीसांचे सरकार आहे. ते गृहमंत्री आहेत. ते नागपूरचे आहेत. त्यामुळे जास्त कराल तर कापून काढू", असे विरोधकांना उद्देशून बोलत आहेत. विशेष म्हणजे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी सभेला उपस्थित होते. देशमुख यांच्या या वक्तव्याचा व्हिडीओ त्यांनी स्वतःच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरही अपलोड केला आहे . दोन दिवसांआधी कळमेश्वरमध्ये काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून भाजप कार्यकर्त्यांना मारहाण झाली होती. त्यात काँग्रेस उमेदवाराच्या पतीचे नाव पुढे आले होते.

# रक्षाविसर्जनाला वेळेत का आला नाही?', उशिरा पोहोचल्यानं नातेवाईकांमध्ये बेदम मारहाण

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरातील पंचगंगा स्मशानभूमीत काल बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास रक्षाविसर्जनासाठी जमलेल्या नातेवाइकांत क्षुल्लक कारणावरून तुंबळ हाणामारी झाली. 'रक्षाविसर्जनाला वेळेत का आला नाही?' या प्रश्नावरून सुरू झालेला वाद क्षणात वाढत गेला आणि तिरडीच्या काठ्यांनी झालेल्या मारहाणीपर्यंत पोहोचला. या घटनेत इचलकरंजी येथील चौघेजण गंभीर जखमी झाले असून स्मशानभूमीत काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झालं होतं.या झटापटीत विकास रामचंद्र गेजगे (वय ५५), निवास रामचंद्र गेजगे (वय ५०), सुनंदा दगडू पारसे (वय ६५) आणि पूजा दगडू पारसे (वय ३५, सर्व जखमी रा. इचलकरंजी) हे गंभीर जखमी झाले. जखमींवर सीपीआर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.गेजगे यांची बहीण अलका बाळू करडे (वय ६०, रा. जरगनगर) यांचे २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी निधन झाले होते. मंगळवारीच त्यांच्यावर पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडले.

बुधवारी सकाळी सुमारे ११.१५ वाजता रक्षाविसर्जनासाठी इचलकरंजीहून त्यांचे भाऊ आणि इतर नातेवाईक आले. त्यावेळी मृत करडे यांच्या नणंदेच्या मुलांनी आणि काही नातेवाइकांनी 'रक्षाविसर्जनाला वेळेत का आला नाही?' अशी विचारणा केली. यावरून वाद निमणि झाला.वाद वाढताच दोन्ही बाजूंमधील





संताप उफाळून आला आणि हाणामारी झाली. अंत्यसंस्कारासाठी वापरलेल्या तिरडीच्या काठ्या हाती घेऊन दोन्ही बाजू एकमेकांवर तुटून पडल्या. काहींची डोकी फुटली, कपडे फाटले आणि स्मशानभूमीत पळापळ उडाली. उपस्थितांनी प्रसंगावधान दाखवून स्थिती नियंत्रणात आणली. या घटनेनंतर निवास गेजगे यांनी वैभव राजू पाटील, शुभम पाटील, नीलेश करडे आणि रेश्मा दत्ता भजनावळे यांच्याविरोधात मारहाणीची तक्रार लक्ष्मीपुरी पोलिस ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरू केली असून सविस्तर तपासानंतर आवश्यक ती कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान अंत्यसंस्कारासारख्या शांत आणि शोककाळातील विधीवेळी घडलेली ही घटना ऐकणाऱ्यांनाही अस्वस्थ करणारी ठरली. उपस्थित नागरिकांपैकी काहींनी या प्रकाराची निंदा करत अशा ठिकाणी नातेवाईकांतील वाद मिटवण्याऐवजी तो वाढविणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे मत व्यक्त केले.

## घरखर्चाला पैसे न दिल्यामुळे कडाक्याचं भांडण, संतापात बायकोला संपवलं

**मुंबई :** कौटुंबिक कलहातून पत्नीची हत्या करून पतीने आत्महत्या केल्याची घटना वांद्रे पूर्व परिसरात घडली. नजमा उर्फ नाजो वार्शी आणि नवाब वार्शी अशी मृतांची नावे आहेत. याप्रकरणी निर्मलनगर पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे.बेहरामनगर येथे नवाब हा पत्नी नजमासोबत राहत होता. एक वर्षांपूर्वी ते दोघेही दुसऱ्यांदा विवाहबध्द झाले होते. नवाज हा रिक्षा चालवण्याचे काम करायचा. तो अनेकदा कामावर जात नव्हता. त्यावरून त्याचे पत्नी नजमासोबत खटके उडत होते. घरखर्चाला पैसे देत नसल्याने त्याच्यात गेल्या १५ दिवसापासून वाद सुरु होता. त्यामुळे नजमा ही माहेरी निघून गेली होती. तेव्हा नवाबने तिला घरखर्चासाठी पैसे देण्याचे आश्वासन देऊन घरी आणले होते.नवाब आणि नजमा यांच्यात काल गुरुवारी पुन्हा वाद झाला. रागाच्या भरात त्याने नजमाची हत्या केली. हत्या केल्यानंतर त्याने स्वतःलाही संपवलं. काल सायंकाळी नजमाची आई तिच्या घरी आली. तिने दरवाजा ठोकला. मात्र आतून काहीच प्रतिसाद आला नाही. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने त्याने याची माहिती निर्मल नगर पोलिसांना दिली. त्यानंतर काहीच वेळात निर्मल नगर पोलीस घटनास्थळी आले. अग्निशमन दलाच्या मदतीने दरवाजा तोडला. तेव्हा ते दोघे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्या दोघांना सायन रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी त्या दोघांना मृत घोषित केले.मंत्री पंकजा मुंडे यांचा स्वीय साहायक आणि डॉ. गौरी पालवे-गर्जे यांचा पती अनंत गर्जे याच्या पोलिस कोठडीत २ डिसेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेला अनंत आणि गौरी यांच्या शरीरावर बऱ्याच जखमा आढळल्या असून या जखमा नेमक्या कसल्या आहेत, हे कळू शकले नाही. त्यामुळे गौरी यांची हत्या आहे की, आत्महत्या हे अद्याप स्पष्ट होऊ शकले नसल्याची माहिती आहे.

## मित्राकडून सतत खिल्ली, त्याची सटकली अन मग..

**मुंबई :** मालाड पश्चिम येथे एका २१ वर्षीय तरुणाची त्याच्या सहकाऱ्याने चाकूने गळा चिरून हत्या केली. गुरुवारी पहाटे हा प्रकार घडल्याची माहिती आहे. कामावरून परत येत असताना झालेल्या वादातून आरोपीने हे कृत्य केले. पीडित व्यक्ती दिलखुश साह वारंवार आरोपी गणेश मंडल (वय २५) याला त्याची पत्नी सोडून गेल्यावरून चिडवत असे, त्याची खिल्ली उडवत असे. या त्रासामुळे संतापलेल्या मंडलने हे कृत्य केल्याची माहिती आहे. याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साह आणि मंडल एका केटरिंग फर्ममध्ये काम करत होते. दोघेही मूळचे बिहारमधील मधुबनीचे रहिवासी असल्याची माहिती आहे. एका कामासाठी त्यांना गुरुवारी पहाटे कांदिवलीला जायचे होते. कामावर जात असताना मालाड येथे दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली होती.त्यानंतर रात्री १२.२५ च्या सुमारास, दोघेही लाइफलाइन हॉस्पिटलजवळील एका इमारतीच्या आवारातून जात होते. त्यावेळी मंडलने केटरिंगच्या कामासाठीच्या चाकूने साहचा गळा चिरला.

## तू माझ्यासोबत राहा, नकार अन त्याने मावशीच्या मुलीला संपवलं


**लखनऊ :** एकतर्फी प्रेमातून एका तरुणाने एका विवाहित महिलेची हत्या केली आहे. ही महिला अजून कोणी नसून त्याची मावस बहीण होती. या तरुणाने विवाहित मावस बहिणीला घरात घुसून तिच्या डोक्यात गोळी घालून तिची हत्या केली. या हत्येमुळे परिसरात मोठी घबराट पसरली आहे. एकतर्फी प्रेमातून या तरुणाने ही भयंकर घटना घडवून आणल्याचं सांगितलं जात आहे.या प्रकरणाची माहिती मिळताच सदर पोलिस अधीक्षक (सीओ) पोलिस दल आणि फील्ड युनिटसह घटनास्थळी पोहोचले. तपास केल्यानंतर त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि विवाहितेचा मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवला आहे. मावस बहिणीची हत्या केल्यानंतर आरोपी तरुणाने पिस्तूल घेऊन पोलिस ठाणे गाठले आणि आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. ही घटना ऐकून पोलिसही हैराण झाले.




ही घटना कौशांबीच्या मंझनपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या उनो गावात घडल्याची माहिती आहे. २४ वर्षीय दीपिका तिवारी असं मृत विवाहितेचं नाव असल्याची माहिती आहे. तिचा २०२२ मध्ये सीतापूर येथील शिवम तिवारीशी विवाह झाला होता. काही दिवसांपूर्वी दीपिका तिवारी उनो गावात तिच्या माहेरी परतली होती. तिला दीड वर्षांचा मुलगाही आहे.या प्रकरणी, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २८ वर्षीय आरोपी अजित कुमार मिश्रा हा मंझनपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या ओसा गावचा रहिवासी आहे. दीपिका तिवारी ही अजित मिश्राच्या मावशीची मुलगी होती. त्याचं तिच्यावर एकतर्फी प्रेम होतं. दीपिकाच लग्न झाल्यानंतरही अजित ही तिचा पाठलाग करत होता.दीपिकाने अजितसोबत राहावे यासाठी तो तिच्यावर सतत दबाव आणत होता.

# पत्नीला खूनामध्ये तो तुरुंगात अनब ती बॉयफ्रेंडसोबत सापडली

**पाटणा :** एका व्यक्तीला पत्नीच्या हत्येच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. गेल्या पाच महिन्यांपासून तो तुरुंगात शिक्षा भोगत होता. मात्र, ज्या पत्नीची हत्या केल्याचा आरोप या व्यक्तीवर होता, ती जिवंत आढळून आली. या व्यक्तीची पत्नी आपल्या प्रियकरासोबत दिल्लीत सापडली. या घटनेने पोलिसही चक्रावून गेले. बिहारमधील मोतिहारी येथे हे धक्कादायक प्रकरण उघडकीस आलं आहे. ही घटना अत्यंत गुंतागुंतीचे झाले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेची माहिती मिळताच तातडीने कारवाई करण्यात आली. आता महिलेला ताब्यात घेण्यात आले आहे आणि मोतिहारी न्यायालयात हजर करण्यात आले.हे प्रकरण अरेराजच्या वॉर्ड क्रमांक १० मधील असल्याची माहिती आहे. येथील रहिवासी रंजित कुमारवर त्याच्या सासरच्यांनी त्याच्या पत्नीची हत्या केल्याचा आरोप केला होता. रंजितने वारंवार पोलिसांकडे विनंती केली, अगदी सीसीटीव्ही फुटेजही दिले, जेणेकरून त्याची पत्नी घराबाहेर पडली होती आणि ती जिवंत आहे हे सिद्ध होईल, परंतु पोलिसांनीही त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. रंजित कुमारची विनंती ऐकण्याऐवजी पोलिसांनी त्याला अटक केली. त्यानंतर त्याला तुरुंगात पाठवण्यात आले.रंजित कुमारचे वडील न्यायासाठी याचना करत होते. जेव्हा प्रकरण न्यायालयात पोहोचले आणि न्यायालयाने आरोपपत्र आणि पुरावे मागितले, तेव्हा मात्र पोलिस महिलेच्या हत्येचा पुरावा देऊ शकले नाही. नंतर, पोलिसांना कळले की ती महिला





नोएडामध्ये लपून बसली आहे.यानंतर रंजितच्या कुटुंबाने आपल्या परीने या महिलेचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आणि अखेर ती जिवंत सापडली. रंजित कुमारच्या वडिलांनी सांगितले की दिल्लीला जाण्यासाठी अंदाजे २०,००० रुपये खर्च आला. आम्ही पोलिसांकडे विनवणी करत राहिलो, पण ते ऐकण्यास तयार नव्हते. पण, अखेर सत्याचा विजय झाला आणि आमचा मुलगा निर्दोष आढळला, असंही ते म्हणाले.

पीडित रंजितच्या वकिलांनी सांगितले की, हा खटला पूर्णपणे चौकशीचा विषय आहे. पोलिस योग्य तपास करण्यात अपयशी ठरल्याने एका निष्पाप पुरूषाला पाच महिने तुरुंगात राहावं लागले. अशा परिस्थितीत पोलिसांवरही कारवाई केली जावी. मानसिक छळ करणाऱ्या महिलेवर मानहानीचा खटला चालवायला हवा.

तर, या संपूर्ण प्रकरणाबाबत एसडीपीओ कुमार रवी यांनी सांगितले की, असा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. पोलिस प्रत्येक पैलूची चौकशी करतील. यात जो कोणी दोषी आढळून येईल त्याच्यावर कारवाई करण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.

# व्हाईट वॉशनंतर गौतम गंभीरचं पद धोक्यात? नवीन प्रशिक्षक सांभाळणार भारताची धुरा?


**गुवाहाटी :** भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात कसोटी सामन्यांची मालिका खेळवली गेली. या मालिकेत दोन सामने रंगले आणि भारताने दोन्ही गमावले. अर्थातच भारताने ही मालिका २-० ने गमावली. आता या घरच्या मैदानावरील इतक्या लाजिरवाण्या कामगिरीनंतर सर्वत्र टीम इंडियाची चर्चा होत आहे. संघाच्या खराब कामगिरीला कशरव उेरलह त्र्रीरा त्र्रालहळी जबाबदार ठरवले जात आहे. बीसीसीआयने आता गंभीरला कसोटीचा प्रशिक्षक ठेवणार की नाही याबाबत काय म्हटले आहे ते पाहा.गेल्या १२ महिन्यांत, भारताने घरच्या मैदानावर न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आणि परदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका गमावली. दरम्यान, त्यांनी इंग्लंडमध्ये कसोटी मालिका बरोबरीत आणली आणि व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी आणि आशिया कप जिंकला. काल मालिकेतील पराभवानंतर, गंभीरला विचारण्यात आले की, 'तो कसोटी क्रिकेटमध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून राहण्यासाठी योग्य व्यक्ती आहे का. माजी भारतीय सलामीवीराने त्याच्या भविष्याचा निर्णय बीसीसीआयवर सोडला होता.'यांनी मंडळाच्या योजनांवर चर्चा केली आहे. त्यांनी मान्य केले की, 'भारतीय फलंदाजांना घरच्या मैदानावर फिरकी गोलंदाजांविरुद्ध खेळण्यास असमर्थता असणे



वाईट आहे, परंतु यावेळी त्यांनी संघात किंवा व्यवस्थापनात कोणतेही आमूलाग्र बदल होणार नाहीत असे संकेतही दिले आहेत. त्यांनी असेही म्हटले आहे की पाच दिवसांची खेळपट्टी कसोटी क्रिकेटसाठी आदर्श आहे आणि खेळाडूंना वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या परिस्थितीत खेळण्याची सवय झाली पाहिजे. विशेष मुलाखतीत सैकिया यांना विचारण्यात आले की दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर झालेल्या पराभवानंतर बीसीसीआय कोणताही निर्णय घेणार आहे का. सैकिया म्हणाले, 'बीसीसीआयला विचार न करता कोणताही निर्णय घेण्याची गरज नाही. आम्ही आमच्या दीर्घकालीन योजनेचे पालन करत आहोत. विजय आणि पराभव हा खेळाचा भाग आहे. आम्ही प्रत्येक वेळी बदल करत नाही आणि आताही करणार नाही. जर काही बदल आवश्यक असतील तर आम्ही एका विशिष्ट कालावधीनंतर निर्णय घेऊ.'आता बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की बोर्ड कोणताही घाईघाईने घेणार नाही. संघ सध्या एका संक्रमणातून जात आहे. प्रशिक्षक गौतम गंभीरबद्दल बोलायचे झाले तर, आम्ही त्यांच्याबाबत कोणताही निर्णय घेणार नाही, कारण विश्वचषक जवळ आला आहे आणि त्यांचा करार २०२७ च्या विश्वचषकापर्यंत चालेल. बीसीसीआय निवडकर्त्यांशी आणि संघ व्यवस्थापनाशी पुढील चर्चा करेल, परंतु घाईघाईने कोणतेही निर्णय घेतले जाणार नाहीत.' याबद्दल अधिकृत विधान असे काही आलेले पाहायला मिळत नाहीये.

## स्मृती मानधना ठरली सर्वात महागडी खेळाडू

**नवी दिल्ली :** महिला प्रीमिअर लीगचा लिलाव बुधवारी झाला, या लिलावात करोडोंच्या बोली लागल्या. पण तरीही सर्वात मालामाल ठरली ती भारताची नॅशनल क्रश स्मृती मानधना. काही दिवसांपूर्वीच वडिलांच्या हार्ट अटॅकमुळे तिला आपलं लग्न पुढे ढकलावं लागलं. पण आयपीएलच्या लिलावानंतर तिच्यासाठी एक गुड न्यूज आली आहे. कारण थझङ २०२६ मध्ये स्मृती मानधना ही सर्वात महागडी खेळाडू ठरलेली आहे.



आयपीएलच्या लिलावाच्या सुरुवातीलाच सर्वांना मोठा धक्का बसला होता. कारण वर्ल्ड कप गाजवणाऱ्या दीप्ती शर्मासाठी ५० लाख रुपये दिल्ली कॅपिटल्सचा संघ मोजत होता. त्यानंतर कोणताही संघ दीप्ती शर्मावर बोली लावत नव्हता. त्यावेळी दीप्ती शर्माला दिल्लीचा संघ फक्त ५० लाख खर्च करत आपल्या संघात दाखल करणार, असे नाचत होते. पण त्याचवेळ एक गोष्ट समोर आली. युपी वॉरियर्स संघाने यावेळी राईट टु मॅच या नियमानुसार दीप्ती शर्माला आपल्या संघात स्थान दिले. त्यावेळी युपीच्या संघाने दीप्तीसाठी तब्बल ३ कोटी २० लाख रुपये मोजले. त्यानंतरही या लिलावात करोडोंच्या बोली लावल्या गेल्या. पण तरीही स्मृती मानधनाच पुढच्या वर्षीची सर्वात महागडी खेळाडू ठरली.स्मृती मानधनाने आरसीबीच्या संघाला जेतेपद मिळवून दिले होते. त्यामुळे आरसीबीसाठी ती सर्वात महत्वाची खेळाडू होती. त्यामुळे आरसीबीच्या संघाने तिला कायम ठेवले आणि त्यासाठी त्यांनी करोडो रुपये मोजले, त्यामुळेच तिला लिलावात उतरता आले नाही.

आरसीबीच्या संघाने यावेळी स्मृतीला आपल्या ताफ्यात कायम ठेवण्यासाठी जी रक्कम दिली आहे, ती सर्वाधिक ठरली आहे. आरसीबीने स्मृतीला संघात कायम ठेवण्यासाठी तब्बल ३ कोटी ४० लाख एवढी रक्कम मोजली होती, तिथपर्यंत कोणताही खेळाडू लिलावात पोहोचू शकला नाही. त्यामुळे थझङ २०२६ साठी सर्वात महागडी खेळाडू ही आता स्मृती मानधना ठरणार आहे. कारण या वर्षासाठी सर्वाधिक रक्कम ही तिलाच मिळणार आहे. स्मृती मानधनाने वर्ल्ड कपमध्येही दमदार कामगिरी केली होती. आता तिलाच पुढच्या वर्षीच्या WPL मध्ये सर्वाधिक रक्कम मिळणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

## मैत्री असावी तर अशी.. स्मृतीच्या मदतीला धावली जेमिमा



**मुंबई :** मैत्री कशी असावी, याचे उत्तम उदाहरण आता जेमिमा रॉड्रिग्जने दिलं आहे. स्मृती मानधना सध्याच्या घडीला वाईट काळामधून जात आहे. या वाईट काळात स्मृती मानधनाच्या मदतीला आता भारतीय संघातील खेळाडू जेमिमा धावून आली आहे. स्मृतीला वाईट काळात साथ देण्यासाठी आता जेमिमाने एक मोठा निर्णय घेतला आहे.स्मृती मानधनाच्या लग्नाच्यावेळी जेमिमाच्या पोस्ट जोरदार व्हायरल होत होत्या. आपल्या लाडक्या मैत्रिणीच्या लग्नापूर्वी जेमिमा ही सर्वात आनंदी होती. स्मृतीची हळद असो किंवा संगीत कार्यक्रम जेमिमाचे व्हिडिओ जोरदार व्हायरल झाले होते. स्मृतीच्या लग्नाबाबत जेमिमा ही खूपच आनंदी होती. पण स्मृतीचे लग्न काही तासांवर येऊन ठेपले होते. त्यावेळीच स्मृतीच्या वडिलांना हार्ट अटॅक आला आणि त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. स्मृतीचे वडील श्रीनिवासन यांना जेव्हा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, त्यानंतर काही वेळातच स्मृतीने आपले लग्न पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर बऱ्याच गोष्टी आता समोर आल्या आहेत. पलाश मुच्छलबद्दल बऱ्याच गोष्टी सोशल मिडियावर फिरत आहेत. त्यामुळे खरं काय आणि खोटं काय, हे कोणालाही समजत नाही. त्यामुळे स्मृती मानधनाला मोठा धक्का बसला आहे आणि तिला सावरण्यासाठी आता जेमिमाने मोठं पाऊल उचललं आहे.जेमिमाने वर्ल्ड कप विजयात मोलाचा वाटा उचलला होता. ऑस्ट्रेलियाचा सामना तिने भारताला एकहाती जिंकवून दिला होता. त्यानंतर जेमिमा ही महिलांची बिग बॅश लीग खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियाला गेली होती. पण स्मृतीच्या लग्नासाठी ती भारतात आली होती आणि लग्न झाल्यावर ती पुन्हा ऑस्ट्रेलियामध्ये लीग क्रिकेट खेळण्यासाठी जाणार होती. पण आता स्मृतीचा वाईट काळ सुरु आहे, तिला मोठा धक्का बसला आहे, तिला सावरण्यासाठी आणि यामधून बाहेर काढण्यासाठी चांगल्या मैत्रिणीची गरज आहे, हे जेव्हा जेमिमाला समजलं तेव्हा तिने ऑस्ट्रेलियामध्ये न जाण्याचा निर्णय घेतला. जेमिमासाठी ही लीग महत्वाची होती. पण मैत्रिणीसाठी आता तिने ही स्पर्धा न खेळता स्मृतीबरोबर राहण्याचा निर्णय घेतला आहे.

## रांचीत सरावानंतर धोनीच्या घरी डिनर पार्टीला पोहोचला कोहली

**मुंबई :** भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात कसोटी मालिका खेळवली गेली. घरच्या मैदानावर सामना असूनही ही मालिका भारताने गमावली. आता India vs South Africa जवळ डशीळशी खेळेल. यानंतर टी-२० मालिकाही खेळेल. आता एकदिवसीय मालिकेचा पहिला सामना हा रांची, झारखंड येथे रंगणार आहे. या सामन्यासाठी संघ झारखंडला पोहोचलेला आहे. पण आता चर्चा रंगतेय ते एका व्हिडिओची.झारखंड पोहोचल्यानंतर तळीरीं घेहश्रळ चशशीं चड उ्हेपळ कोहली टीम इंडियासोबत रांचीमध्ये आहे, जिथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना खेळवला जाणार आहे. कोहलीला पाहण्यासाठी धोनीच्या घराबाहेर मोठी गर्दी जमली होती. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये विराट कोहलीची गाडी रांचीमधील धोनीच्या घरात प्रवेश करताना दिसत आहे.कोहली धोनीच्या घरी पोहोचताच चाहत्यांची आणि माध्यमांची गर्दी जमली. पण सर्वात उल्लेखनीय म्हणजे जेव्हा कोहली हॉटेलमध्ये परतत होता. हे विशेषतः खास होते कारण धोनी स्वतः त्याला सोडायला निघाला होता. यावेळी, धोनी स्वतः त्याची रेंज रोव्हर चालवत होता आणि कोहली त्याच्या शेजारी पुढच्या सीटवर बसला होता. याचा व्हिडिओही सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. गुरुवारी विराटने रांचीमध्ये रोहित शर्मासोबत सराव केला, ज्याचे व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाले. व्हिडिओमध्ये कोहली चांगल्या फॉर्ममध्ये दिसत आहे,



मोठे फटके मारत आहे. दुसरीकडे, रोहित शर्माही मोठे फटके मारताना दिसत आहे, जो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या गेल्या मालिकेत सर्वोत्तम खेळाडू होता. सर्वांच्या नजरा कोहलीच्या कामगिरीवर असतील, जो ऑस्ट्रेलियातील तीनपैकी दोन सामन्यांमध्ये शून्यावर बाद झाला होता. तिसऱ्या सामन्यात त्याने नाबाद अर्धशतक झळकावले. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना ३० नोव्हेंबर रोजी म्हणजे रविवारी झारखंड राज्य क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळला जाईल. कसोटी मालिकेत दक्षिण आफ्रिकेकडून पराभव पत्करल्यानंतर, टीम इंडियावर एकदिवसीय मालिकेत सुधारणा करण्याचे दबाव असेल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वैयक्तिक आयुष्याबद्दल होणाऱ्या चर्चेवर पहिल्यांदाच बोलली उर्मिला कानिटकर



**मुंबई :** मराठी सिनेविश्वातली लोकप्रिय अभिनेत्री उर्मिला कानिटकर -कोठारे सध्या चर्चेत आहे. उर्मिला सध्या छोटा पडदा, वेब सीरिज असो किंवा चित्रपट, नाटक या चारही माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. उर्मिलाचे चाहतेही तिला या वेगवेगळ्या भूमिकांमध्ये पाहून आनंदी आहेत. असं असलं तरी काही वर्षांपासून तिच्या खासगी आयुष्याचीही प्रचंड चर्चा सोशल मीडियावर होत असते. पण यावर तिनं कधीही भाष्य केलं नाही. आता तिनं नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये यावर मौन सोडलं आहे.सोशल मीडियावर सेलिब्रिटींच्या आयुष्याबद्दल नेहमीच चर्चा सुरू असते, यावर बोलताना ती म्हणाली की, या सोशल मीडियावरच्या चर्चेचा, ट्रोलिंगचा किंवा प्रतिक्रियांचा मला त्रास होत नाही, कारण मी त्याकडे फार लक्षच देत नाही, त्या सर्वच गोष्टी खूप टॉक्सिक असतात, असं उर्मिलानं म्हटलं.तसंच इंटरनेटवरच्या काही गोष्टी खऱ्या असतात, काही गोष्टी खोट्या... त्यामुळं त्याचा माझ्यावर फार परिणाम मी होऊ देत नाही. माझ्याकडं इतकं काम आहे, त्यामुळं व्यापातून माझ्याबद्दल कोण काय बोलतंय, याकडे लक्ष देण्यात मला रस नसतो.

# सीनमध्ये डान्स करायचा होता, तो म्हणाला, 'कपडे काढ...'

**मुंबई :** तनुश्री दत्ताने विवेक अग्निहोत्रीबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. तनुश्रीनं विवेक अग्निहोत्री यांच्या 'चॉकलेट' या सिनेमामध्ये काम केलेलं. या सिनेमाच्या शुटिंगदरम्यान तनुश्री आणि विवेक यांच्यात खटके उडाले. त्याबद्दल अभिनेत्रीनं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. इतकंच नव्हे तर नाना पाटेकर यांच्याबद्दलही भाष्य केलंय.पिंकविला'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये विवेक अग्निहोत्री यांचं नाव न घेता तनुश्री म्हणाली की, 'त्यासिनेमात माझे कपडे तोकडे होते आणि मला त्या सीनमध्ये पाण्यात डान्स करायचा होता. ज्याप्रकारे सिनेमाचा दिग्दर्शक माझ्यासोबत बोललेला ते खूप वाईट होतं. 'कपडे उतरव आणि नाच' असं तो म्हणालेला. ही कोणत्याही मिस इंडिया किंवा प्रोफेशनल अभिनेत्रीसोबत बोलण्याची पद्धत नाही. त्यावरून मी बोलले होते. मी तर त्या दिग्दर्शकाचं नावसुद्धा घेतलं नव्हतं. आजही तो बोलतो याबद्दल. चांगल्या पद्धतीनेही तो बोलू शकला असता. मी तेव्हा त्याच्याकडे फक्त पाहिलं आणि तो गप्प बसला. 'मी टू'च्या वेळेला मी बोलून गेले होते.'बॉलिवूड ठिकाना'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये तनुश्री दत्ता म्हणाली की, 'माणसातला राक्षस जेव्हा जागा होता तेव्हा तेव्हा तो कसलाच विचार करत नाही. माणसामध्ये या वयात चांगली कामं केली पाहिजेत. त्यांचा सगळा खोटेपणा आहे. एखाद्याला मारून टाकतील पण स्वतःच्या इमजसाठी काहीही करतील. माझ्यासोबत जे झालं ते फक्त त्यांच्या इगोमुळे झालं. आणि एकटे नाहीयेत ते, त्यांचा ग्रुप आहे.'मी २०१९ मध्ये पत्रकार परिषद घेतलेली, त्यामध्ये मी नाना पाटेकर यांच्या 'नाम' फाऊंडेशनवर प्रश्न उपस्थित केलेले. त्याच्यामध्ये त्यांचे काही पार्टनर आहेत. पण, त्यांच्याकडे पैसा खूप येतो. कुठून येतो काम काय आहे, हे काहीच नाही. वसई गाव आहे, तिथे फोन करून विचारलं तर काहीच नाहीये तिथे. कोणतेही रेकॉर्ड नाहीयेत. माझ्यासोबत जे काही झालं, ते केवळ इगोमुळे. एखादी अभिनेत्री जर तुमच्यापेक्षा मोठी असेल, तिचं नाव असेल तर कसंही तिला त्रास द्यायचा.'नाना पाटेकर आणि तनुश्री दत्ता यांनी 'हॉर्न ओके प्लीज' मध्ये एकत्र काम केलेलं. या सिनेमामध्ये अभिनेत्रीनं इंटीमेट सीन करण्यास नकार दिलेला . त्याबद्दल सांगताना अभिनेत्री म्हणाली, 'मी जेव्हा त्यांच्यासोबत काम करत होते तेव्हा मी त्यांच्यापेक्षा खूप मोठी स्टार होते. २००८ मध्ये काहीच पात्रता नव्हती त्यांची. पण, स्वतःला मोठं





# रातोरात 'नॅशनल क्रश' बनलेल्या गिरीजाला चाहत्याचा आलेला भन्नाट मेसेज..

**मुंबई :** मराठी अभिनेत्री गिरीजा ओक काही दिवसांपूर्वी तिच्या एका मुलाखतीमुळे चर्चेत आली. गिरीजा रातोरात 'नॅशनल क्रश' झाली आणि तिला सोशल मीडियावर चाहत्यांचे मेसेज येऊ लागले. अशातच आता नुकत्याच एका संवादात मेसेजचा किस्सा शेअर केला आहे.गिरीजाने 'नॅशनल क्रश' बनल्यानंतर सोशल मीडियावर भावना व्यक्त केल्या होत्या. तिनं चाहत्यांचे आभारही मानले होते. आता लल्लनटॉपसोबत साधलेल्या संवादात गिरीजाने चाहत्याच्या मेसेजचा किस्सा सांगितलाय. गिरीजा म्हणाली, 'नॅशनल क्रश होण्याबद्दल मला काहीच अंदाज नव्हता. अर्थात, अशा गोष्टींचा अंदाज कुणालाच नसतो. गेल्या काही दिवसांपासून जे काही होतंय त्याची मला मजाच येत आहे. मी या सगळ्याचा आनंदच घेत आहे. यादरम्यान, मला एकानं मेसेज केलाय की, 'Will You Be My Babes Maam'.लोकांनी माझं इन्स्टाग्राम अकाउंट पाहिलं असेल तर सर्वांना अंदाज येईल की, माझं लग्न झालंय आणि मला एक मुलगाही आहे, त्यामुळे माझ्याबद्दल आणि माझ्या कामाबद्दल लोकांना आदर वाटतोय, पण आता नॅशनल क्रश झाल्यानंतर हे असे काही मेसेजही येतायत. 'Will You Be My Babes Ma'am' या मेसेजमध्ये त्यानं मला अप्रोचही केलंय आणि मॅम म्हणत आदरही दिला आहे. तर अनेकांच्या अशा काही संमिश्र प्रतिक्रिया आहेत.' असं गिरीजाने पुढे सांगितलं. एका प्रसिध्द माध्यमाला दिलेल्या मुलाखतीमध्ये गिरीजा म्हणालेली की, त्यांच्या कॉलेजचे एक प्राध्यापक 'वेव्हज' ही संकल्पना सांगत होते. पण त्या 'वेव्हज'चा उच्चार ते 'बेब्स' असं करत होते. त्यांच्या या उच्चाराने विद्यार्थी हसायला लागले. या किस्स्यामुळे नेटकऱ्यांनी अभिनेत्रीला 'बेब्स' ही उपमा दिली आहे.दरम्यान, गिरीजाच्या कामाबद्दल सांगायचं तिनं नाटक, सिनेमा आणि मालिकांमध्ये काम केलंय. गिरीजाने 'इन्स्पेक्टर झेंडे', 'सितारे जमीन पर', 'लेडीज स्पेशल', 'जवान' यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलंय. सध्या ती तिच्या आगामी 'परफेक्ट फॅमिली ' या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. ही वेब सीरिज २७ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

# जनतेच्या विश्वासाचा हक्काचा चेहरा प्रभाग ५ अ सौ कल्याणीताई कुणाल पैठणकर व प्रभाग ५ ब मोहित भंडारी...

## प्रभागाच्या विकासासाठी उच्चशिक्षित व समाजात वावरणाऱ्या उमेदवारास निवडून द्या...







**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक स्वराज्य निवडणुकीचा रनधुमाकूळ सुरू झालेला आहे. मात्र आपले एक मत किती किमतीचे आहे हे निवडणूक मध्ये येते. धुमाकूळ उमेदवार हा निवडणुकीपुरता प्रभागात येऊन काय करून मताची मागणी करतो. साधी भोळी जनता आपले आशीर्वाद रुपी मत त्याला देऊन त्याला निवडून आणते.परंतु निवडून आलेला उमेदवार हा पुन्हा पाच वर्षात प्रभागात फिरकतच नाही. प्रभागाचा विकास करणे ऐवजी प्रभागाला भकास करण्याचे काम कमीशिक्षित व फक्त अर्थकारण करण्यासाठी राजकारणात आलेली लोक समाजाचे नुकसान करतात. अशा गोडबोल्या लोकांपासून प्रभागातील लोकांनी सावध राहून उच्चशिक्षित व समाजाभिमुख असलेल्या लोकांना सहकार्य करावे.

## प्रभाग ५ ब चे उमेदवार युवा नेतृत्व मोहित भंडारी

यांनी सांगितले प्रभाग क्रमांक पाच खूप मोठा प्रभाग आहे यामध्ये अनेक समस्या आहे. विकसित न झालेला विकास म्हणजेच रस्ते नाल्या, रस्त्यांवर स्ट्रीट लाईट, युवकांसाठी जिम, तसेच या प्रभागामध्ये आठवडी बाजार सुद्धा मोठ्या प्रमाणात भरविण्यात येतो मात्र त्या ठिकाणी शौचालय नसल्यामुळे अनेकांना या समस्येला सामोरे जावे लागते त्यामुळे त्या ठिकाणी आम्ही शौचालय बांधणार, तसेच वाहनांचा जो पार्किंगचा प्रॉब्लेम आहे तो सुद्धा आम्ही दूर करणार.. मोहित भंडारी यांची पार्श्वभूमी म्हटलं तर पहिल्यापासूनच त्यांचे आजोबा हे नगरसेवक राहिलेले आहे तसेच त्यांचे मोठे वडील यांनी सुद्धा या प्रभागाचा नगरसेवकाचा पदभार सांभाळलेला आहे आणि भरपूर काही असे विकास कामे केले आहे. प्रभागातील सर्व जनतेस आव्हान करण्यात येते की एकदा संधी देऊन बघा प्रभागाचा विकास नक्कीच आम्ही करणार...

## प्रभाग क्र ५ अ उमेदवार... सौ कल्याणी कुणाल पैठणकर

महाविकास आघाडी

सौ कल्याणी कुणाल पैठणकर यांच्या वतीने प्रभागातील जनता मायबापांना आवाहन करण्यात आले की येत्या निवडणूक मध्ये महाविकास आघाडीच्या तिन्ही उमेदवार म्हणजेच एक नगराध्यक्ष लक्ष्मीताई दत्ता काकस आणि प्रभाग अ आणि ब मधील उमेदवार यांना प्रचंड मताने विजयी करा. खऱ्या अर्थाने प्रभागाचा हा विकास सांस्कृतिक आणि सामाजिक रित्या झाला पाहिजे. त्याचबरोबर वार्डातल्या ज्या काही समस्या आहे तरुणांच्या समस्या नोकरीच्या समस्या बेरोजगारीच्या समस्या प्रभागातील वातावरण सुंदर करण्यासाठी आणि प्रभाग उज्वल करण्यासाठी समस्त मायबाप मतदारांना आपल्या या हक्काच्या उमेदवारांना मत देऊन विजयी करा तुमचं एक मत प्रभागाच्या विकासासाठी...

# सूर्यघर, निधीअर्पितातार्ईच्या विजयानिशी विकासाची ग्वाही-अर्पिताताई शिंदे यांची विजयाकडे वाटचाल...

### महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांची सौ अर्पिताताई शिंदे व इतर उमेदवार यांच्यासाठी जाहीर प्रचार सभा संपन्न.

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक रंगात आलेली असून भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस रिपाई आठवले पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ अर्पिता विजयराज शिंदे व त्यांच्या समवेत उभे असलेल्या सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवार यांच्या प्रचारार्थ आज दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी राज्याचे महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांची स्थानिक स्टेट बँक चौक येथे विराट विजय संकल्प सभा संपन्न झाली. तसेच या सभेत राज्याचे मुख्यमंत्री ना देवेंद्रजी फडणवीस यांनी सुद्धा चित्रफीत द्वारे सौ. अर्पिताताई शिंदे व सोबतचे नगरसेवक उमेदवार यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन बुलढाणा करांना केले आहे. यावेळी कामगार मंत्री आकाशजी फुंडकर, भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, रिपाईचे जिल्हाध्यक्ष भाई दिलीप खरात, तसेच माजी नगरसेवक दादाराव गायकवाड यांनी धुवाधार भाषण करीत बुलढाणा नगरपरिषदेत सुरू असलेल्या गैर व भ्रष्टाचारी कारभारावर कडाडून टीका करत, येणाऱ्या काळात भयमुक्त, भ्रष्टाचार मुक्त, नशा मुक्त बुलढाणा शहर निर्माण करू अशी ग्वाही दिली आहे. राज्याचे महसूलमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी बुलढाण्यामध्ये येत्या तीन महिन्यात अतिक्रमण धारकांना कायमस्वरूपी घराचे पट्टे करून देणार ,तसेच शहरातील ५००० घरांवर सूर्यघर बसवून गरीब कुटुंबीयांना वीज बिल मुक्त करणार, तसेच बुलढाणा शहराच्या विकासासाठी कोणताही निधी कमी पडू देणार नाही, राज्यातील केंद्र सरकार व राज्य सरकार हे बुलढाणा शहराच्या पाठीशी खंबीर उभे आहे, हा विकास व ही संकल्पपूर्ती अधिक जलद गतीने होण्यासाठी भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस रिपाई आठवले पक्षाच्या अधिकृत उमेदवार सौ अर्पिताताई विजयराज शिंदे व त्यांच्या समवेतचे नगरसेवक पदाचे उमेदवार यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन विजय संकल्प सभे दरम्यान ना.बावनकुळे यांनी नागरिकांना केले आहे. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी देखील चित्रफित द्वारे बुलढाणा करांशी संवाद साधून बुलढाणा नगर परिषदेवर आपली करडी नजर असून, शहराच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही चित्रफित मधून देऊन नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ अर्पिताताई शिंदे व सोबतचे नगरसेवक उमेदवार यांच्या पाठीशी मत रुपी आशीर्वाद देण्याची विनंती बुलढाणा करांना केली आहे.





या सभेसाठी हजारो जनसमुदायाने उपस्थिती लावली होती. याशिवाय सभेसाठी कामगार मंत्री मा. ॲड. आकाशदादा फुंडकर, आमदार मा. श्री. चैनसुखजी संचेती, आमदार सौ. श्वेताताई महाले,माजी जिल्हाध्यक्ष डॉ. गणेशराव मांटे, रिपाई आठवले पक्षाचे जिल्हाध्यक्ष भाई दिलीप खरात,भाजपा शिक्षक संघटनेच्या नेत्या सौ संगिताताई शिंदे, भाजपा जिल्हा सरचिटणीस दत्ता पाटील, जेष्ठ विधिज्ञ व्ही.डी. पाटील,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ सविताताई पाटील,यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा हजारोंच्या संख्येने विजय संकल्प यात्राफ्ला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# अखेर अवैध सावकार कृपलानी याच्या पापांचा घडा भरला; गुन्हा दाखल....

## जिल्हा उपनिबंधक विभागाची धाडसी कारवाई; देर आए दुरुस्त आए....

### दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या दणक्यामुळे गुन्हे दाखल..

**जनसंचलन/बुलढाणा**

अकोला येथील सिंधी कॅम्प भागात गेल्या अनेक वर्षांपासून अवैध सावकारीचा धंदा करीत लोकांना लुबाडणा-या अकोला शहरातील प्रतिष्ठित उद्योजक कृपलानी परिवारासह एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वर्षानुवर्षे सावकारीच्या धंद्यातून लोकांकडून अव्वाच्या सव्वा पठाणी वसुलीने पैसे उकळणा-या कृपलानीच्या पापांचा घडा अखेर भरला असून,जिल्हा उपनिबंधक सहकारी विभागाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली आहे. ज्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यामध्ये प्रामुख्याने मनोहर अडीतमल कृपलानी, त्याचा मुलगा दिनेश मनोहर कृपलानी तसेच संतोष श्रीराम अहीर यांचा समावेश आहे.कृपलानी परिवार अवैधरित्या सावकारी करीत असल्याच्या व मोठ्या प्रमाणात नागरिकांना लुबाडत असल्याच्या तक्रारी यापूर्वी अनेकदा करण्यात आल्या होत्या. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन या प्रकरणात गेल्या दोन-तीन वर्षांपासून सातत्याने आवाज उठवण्याचा प्रयत्न करीत आहे.वर्षानुवर्षे सावकारीचा धंदा करून हे कृपलानी पिता-पुत्र चांगलेच मस्तवाल झाले होते. आपले कोणीच काही वाकडे करू शकत नाही,या अविर्भावात ते वागत होते.नागरिकांना आधी कर्ज द्यायचे, त्यांच्याकडून कोरे चेक, संपत्तीचे कागदपत्र घ्यायचे व नंतर मोठ्या प्रमाणात लोकांना ब्लॅकमेल करून अवैधरित्या व्याजाची वसुली करायची हा या पिता-पुत्राचा धंदाच होता. दैनिक जनसरंचलन व सिटी न्यूजने सातत्याने यासंदर्भात वृत्तमालिका प्रकाशित करून सहकार विभाग व जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अधिका-यांना जागवण्याचा प्रयत्न केला.बुलढाणा जिल्हा उपनिबंधक कार्यालयातही कृपलानीच्या विरोधात अनेक तक्रारी होत्या.मात्र आजवर कृपलानी पिता-पुत्रांना प्रशासनाकडून अभय मिळत आले, त्यामुळे त्यांचा माज चांगलाच वाढला होता.सततच्या तक्रारी आणि दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या दबाव व तक्रारीमुळे ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी सकाळी कृपलानीच्या घरावर कर्तव्यदक्ष जिल्हा उपनिबंधक विभागाच्या अधिक्र्यांनी छापा टाकला होता.या छाप्यात अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे, नागरिकांकडून बळजबरीने घेतलेली




संपत्तीची कागदपत्रे, कोरे चेक, बॉण्ड पेपर सापडले होते.त्यानंतर यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक विभागाने कृपलानी पिता-पुत्रास योग्य ते म्हणणे मांडण्याची संधी दिली होती.दरम्यान,चौकशीमध्ये हे दोघेही पिता-पुत्र दोषी आढलल्याने त्यांच्यावर अखेर जिल्हा उपनिबंधक विभागाचे सहकार अधिकारी श्रेणी १ दीपक वामनराव शिरसाठ यांच्या तक्रारीवरून कृपलानी पिता-पुत्रांच्या विरोधात महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ च्या कलम ३९ नुसार गुन्हा दाखल झाला आहे. खरे तर कृपलानी पिता-पुत्रावर ही झालेली कारवाई फारच संथगतीने झालेली आहे. त्यामुळे त्यांना या प्रकरणात सुटण्याची बरीच संधी प्राप्त होण्यास मदत झाली आहे. परंतु या प्रकरणी उशीर झाला तरी आता गुन्हा दाखल झाल्याने अनेक पीडितांना न्याय मिळण्याची अपेक्षा आहे. बुलढाण्यासह अकोला जिल्ह्यात कृपलानी पिता-पुत्राच्या बदमाशीचे आणि नालायकपणाचे बळी ठरलेले आहेत.त्या सर्वांना न्याय मिळू शकेल.फक्त या प्रकरणी पोलिस आणि उपनिबंधक कार्यालयाने यापुढील काळात चाल-ढकल करू नये.पोलिस विभागाने या प्रकरणी लवकरात लवकर कृपलानी पिता-पुत्रांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी करणे गरजेचे आहे. जोपर्यंत या दोघाही पिता-पुत्रांवर योग्य ती कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपली मोहीम अशा अवैध सावकारांच्या विरोधात सुरूचठेवणारआहे.

## भूमिपुत्र खा. प्रतापराव जाधव यांच्या जीवनप्रेरणेवर आधारित चित्रपटाची अधिकृत घोषणा!

**जनसंचलन/बुलढाणा**

लक्ष्मी एंटरटेनमेंट्स निर्मित आणि निर्माते ॲड. इतिश्री किशोर गायकवाड व ॲड. अमृता शैलेश गायकवाड यांच्या पुढाकाराने भारत सरकारचे आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री तसेच बुलडाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार प्रतापराव जाधव यांच्या प्रेरणादायी कार्यावर आधारित भव्य मराठी चित्रपट तयार होत असल्याची अधिकृत घोषणा आज करण्यात आली. खासदार प्रतापराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात या चित्रपटाच्या ङ्भूमिपुत्रफ या शीर्षकाचे पोस्टर अनावरण करण्यात आले. या चित्रपटामध्ये मराठी चित्रपटसृष्टीचे सुपरस्टार व लोकप्रिय अभिनेता प्रसाद ओक प्रमुख भूमिकेत झळकणार असल्याची माहिती निर्मात्यांनी दिली. मोठ्या प्रमाणावर शेतकरी, कार्यकर्ते व नागरिकांच्या उपस्थितीत झालेल्या या पोस्टर लाँचिंगमुळे बुलडाणा जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रतापराव जाधव यांच्या दशकांतील राजकीय प्रवास, जनसंपर्क, संघर्ष आणि सामान्य माणसासाठी लढण्याची जिद्द ङ्भूमिपुत्रफ या चित्रपटातून प्रभावीपणे मांडली जाणार आहे. निर्माते ॲड. इतिश्री किशोर गायकवाड आणि ॲड. अमृता शैलेश गायकवाड यांनी सांगितले की, प्रतापराव जाधव यांच्या सेवाभावी कार्याची प्रेरणा संपूर्ण महाराष्ट्रासाठी आदर्श आहे. ती मोठ्या पडद्यावर अचूक आणि भव्य रूपात सादर करण्याचा आमचा प्रयत्न असेल.फ्फ प्रसाद ओक सरांच्या दमदार अभिनयासह आणि बुलडाणा प्रदेशातील लोकभावनांशी घट्ट जोडलेली कथा असलेला भूमिपुत्र हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चित्रपटाचे शूटिंग लवकरच सुरू होणार असून, पुढील काही दिवसांत अधिकृत कास्टिंग आणि तांत्रिक माहितीदेखील जाहीर करण्यातयेणारआहे




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८